दिनांक :– ०४.०१.२०१९.

## प्रेसनोट

आरोपी वसंता पुंजाजी मानमोठे, खाजगी इसम रा. ताकतोडा यांनी १०,०००/– रू.ची लाच स्विकारले प्रकरणी त्यांना ताब्यात घेतले.

---

पिडीत तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांची आई व तक्रारदार यांचे काकांचे नावे सामाईक क्षेत्र असलेल्या आजेगाव शेत शिवारातील जमीनीचे क्षेत्र वेगवेगळे करण्यासाठीचे काम तहसिलदार सेनगांव वैशाली पाटील यांचे ओळखीने कलम ८५ (महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेण्यु कोड १९६६) अन्वये करून देण्यासाठी खाजगी इसम श्री मानमोठे हे ३०,०००/–रू. लाचेची मागणी करत असल्याबाबत अॅ.क.ब्युरो हिंगोली कार्यालयात तक्रार दिली होती. त्यावरून तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली. सदर तक्रार पडताळणीमध्ये खाजगी इसम मानमोठे यांनी तक्रारदार यांना त्यांचे काम तहसिलदार सेनगाव श्रीमती वैशाली पाटील यांचेकडून त्यांचे ओळखीने करून देण्यासाठी ३०,०००/– रूपयांची लाचेची मागणी करून लाचेचा पहिला हप्ता म्हणून १०,०००/– रूपये स्विकारण्यास सहमती दिली होती. त्यावरून दिनांक ०४.०१.२०१९ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम वसंता मानमोठे यांना तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम १०,०००/– रूपये स्विकारल्यावरून त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी श्री. संजय लाटकर पोलीस अधीक्षक, श्रीमती अर्चना पाटील अपर पोलीस अधीक्षीका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड व श्री रविंद्र थोरात, पोलीस उपअधिक्षक अॅ.क.ब्युरो, हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जितेंद्र पाटील, यांनी नितीन देशमुख पोलीस निरीक्षक, पोहेकॉ शेख उमर, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री आढाव, पोना श्री संतोष दुमाने, पोना श्री शेख जमीर, पोना श्री विजयकुमार उपरे, पोना महारूद्रा कबाडे, पोशि श्री प्रमोद थोरात, पोशि श्री अविनाश किर्तनकार, चापोना श्री आगलावे अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क.–१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६–२२३०५५,

**मोबाईल कमांक :–** ९८२३०१८४३९, ९५१८५८५६५२ व ९९२३०४२५६५.

Scanned by CamScanner